| | |
|---|---|
| ला. प्र. वि. | **कार्यालय, पोलीस उप अधिक्षक,**<br>**लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना**<br>टोल फ्री क्रमांक - 1064<br>कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252<br>ई मेल - dyspacbjalana@gmail.com |

:: प्रेस नोट :: दिनांक :- 23.10.2021.

**गुन्हयात जप्त असलेले मारुती सुझुकी व्रिझा वाहन सोडण्यासाठी पोलीस ठाणे सेवली जि. जालना येथील पोहेकॉ/1054 श्री. कारभारी श्रीरंग जाधव व पोकॉ/127 श्री. सचीन विजय कायंदे यांना तक्रारदाराकडुन 1,000/- रुपयेची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | 1. श्री. कारभारी श्रीरंग जाधव, वय 54 वर्ष व्यवसाय नोकरी, पोहेकॉ/1054 नेमणुक पोलीस ठाणे सेवली जि. जालना, रा. मोरे यांचा मळा, जगन्नाथ नगर, परतुर जि. जालना<br>2. श्री. सचीन विजय कायंदे वय 32 वर्ष व्यवसाय नोकरी, पोकॉ/127 नेमणुक पोलीस ठाणे सेवली जि. जालना. |
| 2 | गुन्हा घडला ता व ठिकाण | :- | दि- 23.10.2021 रोजी पोलीस ठाणे सेवली जि. जालना येथील गेटवर |
| 3 | लाच स्विकारली रक्कम | :- | 1,000/- रुपये. |

याबावत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, पोलीस ठाणे सेवली जि. जालना येथे मागील काही दिवसांपुर्वी दाखल झालेल्या कांदा बियाण्यांचे गुन्हयात तक्रारदार यांची मारुती सुझुकी व्रिझा ही चारचाकी जप्त करण्यात आलेली होती, ती गाडी सोडवुन घेण्याचा मा. न्यायालयाने आदेश दिलेला होता. परंतु पोलीस ठाणे सेवली जि. जालना येथील पोहेकॉ/1054 श्री. कारभारी श्रीरंग जाधव व पोकॉ/127 श्री. सचीन विजय कायंदे यांनी तक्रारदारास पोलीस ठाण्यात बोलावुन घेवुन त्यांची गुन्हयात जप्त असलेली चारचाकी गाडी सोडण्यासाठी 1,000/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदारास पोलीस ठाणे सेवली जि. जालना येथील पोहेकॉ/1054 श्री. कारभारी श्रीरंग जाधव व पोकॉ/127 श्री. सचीन विजय कायंदे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि. 23.10.2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांनी लाच मागणी पडताळणी केली असता पोलीस ठाणे सेवली जि. जालना येथील पोहेकॉ श्री. कारभारी श्रीरंग जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांची गुन्हयात जप्त असलेली मारुती सुझुकि कंपनीची व्रिझा चारचाकी गाडी सोडण्यासाठी 1,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वीकारण्यास तयार असल्याचे निष्पण्ण झाले, त्यावरुन सेवली पोलीस ठाणे येथे लाचेचा सापळा लावला असता पोहेकॉ श्री. कारभारी श्रीरंग जाधव यांचे सांगणेवरुन पोलीस अंमलदार पोकॉ/127 श्री. सचीन विजय कायंदे यांना तक्रारदार यांचेकडुन 1,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने पोलीस ठाणे सेवली जि.जालनाचे गेटवरच रंगेहाथ पकडले आहे.

लोकसेवक 1. श्री. कारभारी श्रीरंग जाधव, वय 54 वर्ष व्यवसाय नोकरी, पोहेकॉ/1054 नेमणुक पोलीस ठाणे सेवली जि. जालना, रा. मोरे यांचा मळा, जगन्नाथ नगर, परतुर जि. जालना 2. श्री. सचीन विजय कायंदे वय 32 वर्ष व्यवसाय नोकरी, पोकॉ/127 नेमणुक पोलीस ठाणे सेवली जि. जालना यांचे विरुध्द पोलीस ठाणे सेवली जि. जालना येथे गुन्हा दाखल करणे बाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक मो.न. 9823365677, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,<br>
ला प्र वि, जालना.